



© BMM Marathi Shala eBook Team

# बृहन्महाराष्ट्र मंडळातील मराठी मातृभाषा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सचित्र कार्यपुस्तिका

## विश्वभारती बालमंदिर  पुस्तिका

मराठी भाषा बालमंदिर  पुस्तिका पहिली आवृत्ती - २०२३

**बृहन्महाराष्ट्र मंडळ २.० पुस्तक समिती**

**उत्तर अमेरिका**

**संपर्क:** shala@bmmonline.org

Recommendation: Eligibility of age for Balmandir: 4 - 6 years. Minimum two year gap between two consecutive level exams and/or 120/80 instruction hours are recommended. This helps to prepare the students better and overall studentship retains. Normally a teacher needs 120/80 hours minimum (60/40 hours per academic year) to teach the entire syllabus (based on eBook of the particular level). Rarely do students grasp the syllabus in a shorter time. **The eligibility of age criteria varies depending on each student’s progress. The older aged students’ may progress faster than other students for primary levels.**

## बालमंदिर पुस्तिके विषयी मनोगत

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या वतीने महाराष्ट्राच्या बाहेर राहणाऱ्या विद्यार्थ्यांना, मराठी शिकवण्यासाठी उपयोगी अशी विश्वभारती बालमंदिर पुस्तिका.

प्रस्तुत पुस्तिकेमध्ये श्लोक, प्रार्थना, कविता, गोष्टी, उतारे, शब्द ओळख, माहिती, सामान्य ज्ञान आणि सांस्कृतिक गोष्टींचा याचा समावेश आहे.

उत्तर अमेरिकेतील अनेक गावांमध्ये गेली कित्येक वर्षे मराठी शाळा चालू आहेतच, परंतु २००७ मध्ये फिलाडेल्फिया येथे भरलेल्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या परिषदेत या सर्व शाळांना एका छत्राखाली आणण्याच्या विचाराला चालना मिळाली. सर्व शाळांसाठी एकसंध अभ्यासक्रम तयार करण्याच्या कामाची मुहूर्तमेढ रोवली गेली.

नॉर्थ अमेरिकेतील काही शाळांकडून आम्ही काही लेख, गोष्टी, गाणी, घेतली आहेत. त्यांचे आम्ही जाहीर आभार मानतो.

आम्हाला विश्वभारती मालिकेची आवृत्ती सादर करताना मनापासून आनंद होत आहे. ह्या संपूर्ण प्रक्रियेत आमच्या बृहन्महाराष्ट्र मराठी शाळा समितीने, अध्यक्ष संदीप दीक्षित आणि शाळा विभागाचे नेतृत्व करणाऱ्या सविता मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली भरपूर मेहनत घेतली. समितीतील कार्यकर्त्या सविता मोरे, श्रुती पांडे, मीनल जोशी, अंजलि भिडे, बकुळ गोडबोले, नुपूर कर्णिक, ह्यांनी आपले योगदान केले आहे. पुस्तकाचे मुखपृष्ठ शितल रांगणेकर यांनी बनविले आहे. बालमंदिर पुस्तिकेचे मुद्रितशोधन, अंजली भिडे, सविता मोरे, मीनल जोशी यांनी केले आहे. त्यांचे मनापासून आभार.

या कामात नवनव्या संकल्पना राबवण्यासाठी आणि अधिकाधिक प्रगती करण्यासाठी सर्व शिक्षक, पालक आणि मराठी प्रेमींची आम्हाला मदत हवी आहे. आपल्या सूचना आम्हाला अवश्य कळवा. आम्ही त्यांचा पुढील आवृत्यांमध्ये निश्चित उपयोग करू!

बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका BMM shala e-book team.

© BMM Marathi Shala eBook Team 

## बालमंदिर syllabus

| ओळख | लेखन | माहिती | सामान्य ज्ञान | संस्कृती |
|---|---|---|---|---|
| प्रार्थना | | | | |
| अंक- १- २० | अंक १-२० | अंक | | |
| मुळाक्षरे | | मुळाक्षरे | | |
| १२ स्वर | स्वर | | | |
| ३६ व्यंजने | | | | |
| वार | | वार | | |
| रंग | | रंग | रंग | रंग |
| आपले सण | | सण | | सण |
| अन्न-पदार्थ | | | अन्न-पदार्थ | अन्न-पदार्थ |
| आपला परिवार | | | | |
| स्वतः बद्दल माहिती | | | | |
| फुले | | | | |
| फळे | | | | |
| परिसर | | | परिसर | |
| बडबड गीते | | | | |
| गोष्टी | | पारंपारिक गोष्टी | प्राण्यांच्या गोष्टी | सांस्कृतिक गोष्टी |

Study material can be made by preparing color slides of letters, numbers, colors, fruits and body parts, etc.

© BMM Marathi Shala eBook Team

**अभ्यासक्रम**

अ ते ज्ञ अक्षर ओळख ( अ ते अः लिहिता येणे ).

१ ते ३० अंक (१ ते १० लिहिता येणे ).

३० + शब्द

फळे, प्राणी, अवयव, रंग. इतर (प्रत्येक अक्षरा पासून सुरु होणारे शब्द)

आठवड्यातील वार.

२ ते ३ वाक्यात संभाषण.

नाव, वय, वाढदिवस, आवडता खेळ/ प्राणी/ रंग

परीक्षा ( जून महिन्यात )

तोंडी ( २५ ते ३० गुण )

लेखी ( १५ ते २० गुण )

एकूण गुण- ५०

पुढच्या वर्गात जाण्यासाठी किमान ८० टक्के गुण पाहिजेत.

**<u>प्राणी</u>**

Monkey 🐒- माकड

Rabbit 🐇- ससा

Sheep 🐑 - मेंढी

Dog 🐕 - कुत्रा

Cat 🐈 - मांजर

Goat 🐐- शेळी

Donkey - गाढव

Cow 🐄- गाय

Buffalo 🐃- म्हैस

© BMM Marathi Shala eBook Team

Ox 🐂- बैल

Horse 🐎- घोडा

Camel 🐪- उंट

Deer 🦌 - हरीण

Tiger 🐅- वाघ

Lion 🦁- सिंह

**फळे**

आंबा - Mango

अननस - Pineapple 🍍

डाळिंब - Pomegranate

केळ - Banana 🍌

सफरचंद - Apple 🍎

द्राक्ष - Grapes 🍇

फणस - Jackfruit

खरबूज - Melon 🍈

संत्र - Orange 🍊

पपई - Papaya

कलिंगड - Watermelon 🍉

लिंबु - Lemon 🍋

पेरू - Guava

अंजीर - Fig

© BMM Marathi Shala eBook Team

## गाणी लिंक्स

1. Swar

marathi mulaksharanche gane

2. Vyanjan Geet

https://www.youtube.com/watch?v=sgyegJvT3zI

3. Ankanche gaane

ankache gane in marathi lyrics

Watch Bal Ganesh Animated Stories for FREE:

►http://bit.ly/1zsjKxA

Watch all the Amazing Ramayan Stories:

►http://bit.ly/1zpV1LR

Watch all the Amazing Mahabharat Stories:

►http://bit.ly/1AeY1fo

## बडबड गीते

### एका माकडाने काढलंय दुकान

एका माकडाने काढलंय दुकान
आली गिऱ्हाईके छान छान
मनीने आणले पैसे नवे
म्हणाली शेटजी उंदीर हवे
अस्वल आले नाचवीत पाय
म्हणाले मधाचा भाव काय
कोल्ह्याने मागितला गुळाचा रवा
आणि म्हणाला मांडून ठेवा
माकड म्हणाले लावून गंध
आता झालंय दुकान बंद

© BMM Marathi Shala eBook Team

## झुक झुक झुक झुक अगीनगाडी

झुक झुक झुक झुक अगीनगाडी
धुरांच्या रेघा हवेत काढी
पळती झाडे पाहूया
मामाच्या गावाला जाऊया

मामाचा गाव मोठा
सोन्याचांदीच्या पेठा
शोभा पाहुन घेऊया

मामाची बायको गोरटी
म्हणेल कुठली पोरटी
भाच्यांची नावे सांगूया

मामाची बायको सुगरण
रोज रोज पोळी शिकरण
गुलाबजामुन खाऊया

मामा मोठा तालेवार
रेशीम घेईल हजार वार
कोट विजारी लेऊया

© BMM Marathi Shala eBook Team

## सांग सांग भोलानाथ

सांग सांग भोलानाथ, पाऊस पडेल काय
शाळेभोवती तळे साचून सुट्टी मिळेल काय

भोलानाथ दुपारी आई झोपेल काय
लाडू हळूच घेताना आवाज होईल काय

भोलानाथ भोलानाथ, खरं सांग एकदा
आठवड्यातून रविवार येतील का रे तीनदा

भोलानाथ उद्या आहे गणिताचा पेपर
पोटात माझ्या कळ येऊन दुखेल का रे ढोपर

## नाच रे मोरा

नाच रे मोरा, आंब्याच्या वनात
नाच रे मोरा नाच !

ढगांशी वारा झुंजला रे
काळा काळा कापूस पिंजला रे
आता तुझी पाळी, वीज देते टाळी
फुलव पिसारा नाच !

© BMM Marathi Shala eBook Team

झरझर धार झरली रे

झाडांची भिजली इरली रे

पावसात न्हाऊ, काहीतरी गाऊ

करुन पुकारा नाच !

थेंब थेंब तळ्यात नाचती रे

टपटप पानांत वाजती रे

पावसाच्या रेघात, खेळ खेळू दोघांत

निळ्या सवंगड्या नाच !

पावसाची रिमझिम थांबली रे

तुझी   माझी   जोडी जमली रे

आभाळात छान छान, सात रंगी कमान

कमानीखाली त्या नाच !

## बोधपर गोष्टी

### उंदराची टोपी

एक होता उंदीर मामा. रस्त्याने जाताना त्याला मिळाले एक फडके. फडके घेऊन तो गेला धोब्याकडे. धोब्याला म्हणाला, “धोबी दादा,धोबी दादा माझे फडके धुवून दे”. धोब्याने फडके धुवून दिले. मग उंदिरमामा गेला शिंप्याकडे. “शिंपीदादा, शिंपीदादा, शिंपीदादा मला एक छानशी टोपी शिवून दे तिला रंगीत गोंडेही लाव.” शिंप्याने उंदीर मामाला टोपी शिवून दिली.

उंदीर मामाची टोपी डोक्यावर घातली एक ढोलके घेतले. ते वाजवत तो गाणे गाऊ लागला “राजाच्या टोपीपेक्षा माझी टोपी छान. ढुम,ढुम,ढुमक!” राजाने हे ऐकले . तो शिपायांना म्हणाला, “जा रे, त्या उंदराला पकडून आणा.”

शिपायांनी उंदीर मामाला पकडले. दरबारात आणले. त्याची टोपी काढून राजाकडे दिली. मग उंदिरमामा म्हणाला, “राजा भिकारी, माझी टोपी घेतली. ढुम,ढुम,ढुमक!” हे ऐकून राजा खूप रागावला. त्याने उंदराकडे टोपी फेकून दिली. उंदिरमामाने टोपी

पुन्हा डोक्यावर घातली व तो गाणे गाऊ लागला. “राजा मला भ्याला. माझी टोपी दिली. ढुम,ढुम,ढुमक!” हे गाणं गात गात तो राजवाड्यातून निघून गेला.

उपदेश : **शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ**.

© BMM Marathi Shala eBook Team 

## चल रे भोपळ्या टुणुक टुणुक

एक होती म्हातारी. एकदा ती आपल्या लेकीकडे जायला निघाली. लेक रहायची दुसऱ्या गावाला. रस्त्याने जाताना मधेच एक मोठे जंगल होते . म्हातारी काठी टेकत, टेकत रस्त्याने निघाली. वाटेत तिला भेटला कोल्हा. तो म्हणाला, “म्हातारे, म्हातारे, मी तुला खातो.” पण म्हातारी हुशार होती. ती म्हणाली, “मला खाऊन तुझे पोट भरणार नाही. त्यापेक्षा थोडे दिवस थांब. लेकीकडे जाते, तूप रोटी खाते, लठ्ठ मुठ्ठ होते, मग मला खा.” कोल्ह्याला म्हातारीचे म्हणणे पटले. म्हातारी पुढे निघाली. तिला भेटला वाघ. तो म्हणाला, “म्हातारे, म्हातारे, मी तुला खातो.” त्याने डरकाळी फोडली. म्हातारी त्याला म्हणाली, “मला खाऊन तुझे पोट भरणार नाही. त्यापेक्षा थोडे दिवस थांब. लेकीकडे जाते , तूपरोटी खाते, लठ्ठमुठ्ठ होते, मग मला खा.” वाघाची अशी समजूत काढून म्हातारी पुढे निघाली. लेकीकडे गेली. तिथे ती खूप दिवस मजेत राहिली. खाऊन पिऊन लठ्ठ मुठ्ठ झाली. थोडया दिवसांनी तिला वाटले की आपण आपल्या घरी जावे तेव्हा तिला आठवले की कोल्हा आणि वाघ आपल्याला खाणार आहेत . तिने हे सर्व आपल्या लेकीला सांगितले मग लेकीने तिला जादूचा भोपळा दिला . आपल्या घरी परत येताना तिने एक मोठा लाल भोपळा घेतला. त्यात बसून ती भोपळ्याला म्हणाली, “चल रे भोपळया टुणुक

टुणुक." भोपळा रस्त्याने निघाले. वाटेत वाघाने भोपळा पाहिला. तो म्हणाला, "म्हातारे, म्हातारे थांब!" आतून म्हातारी म्हणाली, "कशाची म्हातारी आणि कशाची कोतारी. चल रे भोपळ्या टुणुक टुणुक." त्याबरोबर भोपळा जोरात पळू लागला.

थोडं पुढे गेल्यावर वाटेत कोल्हा भेटला. तो म्हणाला, "म्हातारे, म्हातारे थांब!" आतून म्हातारी म्हणाली, "कशाची म्हातारी आणि कशाची कोतारी." कोल्ह्याने भोपळ्याला थांबवण्याचा प्रयत्न केला. पण म्हातारी आतून म्हणाली, "चल रे भोपळया टुणुक टुणुक!" पुन्हा भोपळा जोरात पळू लागला. आणि म्हातारी वाघाच्या जबड्यातून पळून गेली.. पुढे आल्यावर वाटेत कोल्हा भेटला. तो म्हणाला, "म्हातारे, म्हातारे थांब!" आतून म्हातारी म्हणाली, "कशाची म्हातारी आणि कशाची कोतारी चल रे भोपळ्या टुणूक टुणूक!" कोल्ह्याने भोपळयाला थांबवण्याचा प्रयत्न केला. पुन्हा भोपळा जोरात पळू लागला. अशी होती हुशार म्हातारी. कोल्हा आणि वाघाच्या तावडीत ती काही सापडली नाही. भोपळयात बसून ती सुखरूप आपल्या घरी पोचली. तात्पर्य: - **शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ.**

© BMM Marathi Shala eBook Team

## बुडबुड घागरी

तो टोपी घालणारा उंदीर मामा आठवतोय? तो गेला एकदा जंगलात. तिथे त्याला एक माकड आणि मांजर भेटले. त्या तिघांची चांगली मैत्री जमली. एक दिवस त्या तिघा मित्रांनी खीर बनवण्याचे ठरवले. माकड म्हणाले, “मी आणतो साखर.” मांजर म्हणाले, “मी आणतो दूध.” उंदीर म्हणाला, “मी आणतो शेवया.” तिघांनी पातेले भर खीर केली.

मग माकड म्हणाले, “चला आपण आंघोळ करून येऊ आणि मगच खीर खाऊ.” इकडे मांजराच्या तोंडाला पाणी सुटले होते. मांजर म्हणाले , “तुम्ही जा मी खीर शिजवतो.” माकड आणि उंदीर म्हणाले, “ठीक आहे.” आणि ते दोघे आंघोळ करण्यासाठी गेले.

मांजराच्या तोंडाला पाणी सुटले. आणि त्याने थोडी खीर खाल्ली. तेवढी खाऊन झाली पण मांजराला आणखी खीर खावीशी वाटली. मांजराने पुन्हा थोडी खीर खाल्ली. असे करत मांजराने सगळी खीर खाऊन टाकली. थोडया वेळाने माकड व उंदीर आले. पाहतात तो काय, खिरीचे पातेले रिकामे ! त्यांनी मांजराला विचारले, “खीर कोणी खाल्ली?” मांजर म्हणाले, “मला नाही माहीत.”

मग माकडाने एक घागर घेतली व सर्वजण नदीवर गेले. माकडाने घागर पाण्यात पालथी घातली. त्यावर उभे राहून माकड म्हणाले, “हुप हुप करी, वरचे डोंगरी, मी खीर खाल्ली तर बुड घागरी.” पण घागर काही बुडाली नाही. मग उंदीर घागरीवर उभा राहिला व म्हणाला, “चूं चूं करी, वरचे डोंगरी, मी खीर खाल्ली तर बुड घागरी.” पण घागर काही बुडाली नाही. आता मांजराची पाळी आली. मांजर खरे तर घाबरले होते. कसेबसे ते घागरीवर उभे राहिले व म्हणाले, “म्यांव म्यांव करी, वरचे डोंगरी, मी खीर खाल्ली तर बुड घागरी.” अन काय आश्चर्य? घागर पाण्यात बुडाली. चोरून खीर खाल्ल्याची मांजराला शिक्षा मिळाली.

तात्पर्य: **नेहमी खरे बोलावे**

© BMM Marathi Shala eBook Team

## कावळा - चिमणीची गोष्ट

एक होती चिमणी आणि एक होता कावळा. चिमणीचं घर होत मेणाच, छोटंस आणि खूप सुंदर. चिमणी सारखी कामात असे. आळशी कावळ्यासारखं बसायला तिला मुळीच आवडत नसे. याउलट कावळयाचं घर शेणाचं होतं. घरात सगळीकडे पसाराच पसारा असे. कावळा दिवसभर इकडे तिकडे टिवल्याबावल्या करायचा, बडबड करायचा. हा खोडकर कावळा कोणालाच आवडायचा नाही.

एक दिवस काय झालं आकाशात मोठे मोठे काळे ढग आले. सोसाटयाचा वारा सुटला. टप् टप् पाऊस पडू लागला. झाडे भिजली. जमिनीवरून धो धो पाणी वहायला लागलं. कावळयाच घर होत शेणाच. तेही पाण्यात वाहून गेल. हू...हू...हू...हू...! कावळा काकडला. आता कुठे जाव बर? एवढयात त्याला आठवल, चिमणीच घर आहे शेजारीच. मग कावळा आला चिमणीकडे. पण चिमणीच्या घराचे दार तर बंद होते. “चिऊताई, चिऊताई, दार उघड!”

चिमणी आतून म्हणाली, “थांब माझ्या बाळाला काजळ-पावडर लावते.” थोडावेळ थांबून पुन्हा कावळयाने कडी वाजवली, “चिऊताई, चिऊताई, दार उघड!” चिमणी आतून म्हणाली, “थांब माझ्या बाळाला झोपवते” इकडे कावळ्याला खूप भूक लागली

होती. पण सगळीकडे पाणीच पाणी झाले होते. काय करतो बिचारा! एवढंस तोंड करून कुडकुडत उभा राहिला. चिऊताईचे बाळ झोपल्यावर तिने दार उघडले.

कावळा घरात आला. भिजल्यामुळे त्याला खूप थंडी वाजत होती. चिमणी म्हणाली, “तू बैस चुलीपाशी.” कावळा चुलीपाशी बसला. चुलीवर होती खीर ! कावळ्याच्या तोंडाला पाणी सुटले. त्याने थोडी थोडी करत सगळी खीर संपवली. थोड्या वेळाने पाऊस थांबला. कावळ्याने घरटयाचे मागचे दार उघडले आणि तो भुर्रकन उडून गेला. असा होता कावळा आळशी आणि लबाड.

तात्पर्य : **लबाडपणाने ध्येय कधीच साध्य होत नाही.**

© BMM Marathi Shala eBook Team 

## सिंह आणि उंदीर

उन्हाळ्याच्या दिवसात, एक सिंह, एका आंब्याच्या थंड छायेत सुस्त निजला होता. तिथे एक उंदीर आला. उंदीर चुकून सिंहाच्या अंगावर चढला. त्यामुळे जागा होऊन, सिंहाने उंदराला पंजात धरले आणि आता त्याला तो फाडून टाकणार, इतक्यात त्या उंदराने त्याची प्रार्थना केली, “महाराज! आपण थोर, सर्व श्वापदांचे राजे. मी आपल्यापुढे केवळ रंक. माझ्या रक्ताने आपले हात विटाळू नयेत. मला जीवदान दयावे, हेच आपणास उचित आहे.” ते ऐकून सिंहास त्याची दया आली आणि त्याने त्यास सोडून दिले.

पुढे एके दिवशी सिंह अरण्यात फिरत असताना आंब्याच्या झाडा जवळ गेला. त्याच आंब्याजवळ पारध्याने जाळे मांडले होते, त्यात सिंह सापडला. त्यावेळी त्याने आपले सगळे बळ खर्चून फार धडपड केली. पण त्याची सुटका होईना. तेव्हा तो निराश झाला आणि मोठमोठयाने ओरडू लागला. ते ओरडणं ऐकून तो उंदीर त्या ठिकाणी आला आणि सिंहास म्हणाला, “राजा, भिऊ नको, स्वस्थ रहा.” इतके बोलून, त्याने आपल्या दातांनी ते जाळे कुरतडले व सिंहाची सुटका केली. तात्पर्य: **चांगले वागलेले वाया जात नाही. सगळ्यांसोबत अदबीने वागावे**.

## प्रमाणिक लाकुडतोड्या

एका गावात एक लाकूडतोड्या राहत होता. एके दिवशी दुपारी लाकूड तोडण्यासाठी नदीजवळ गेला. नदीजवळ एक मोठे झाड होते. झाड तोडत असताना त्याची अचानक कुऱ्हाड पाण्यात पडली. लाकुडतोड्याकडे एकच कुऱ्हाड होती आणि नेमकी तीच कुऱ्हाड त्याने गमावली.

त्याच्याजवळ दुसरी कुऱ्हाड विकत घेण्यासाठी पुरेसे पैसे नव्हते. तो नदी जवळ बसला आणि रडू लागला.. नदी उर्फ सरितादेवीने त्याचे रडणे ऐकले. ती त्याच्या समोर प्रकट झाली आणि तिने विचारले, “का रे? का रडत आहेस तू?” लाकूडतोड्याने सरितादेवी ला गमवलेल्या कुऱ्हाडी बदल सांगितले.

सरीतादेवी अदृश्य झाली. नदीतून ती परत अली तेव्हा तिच्या हातात सोन्याची कुऱ्हाड होती. ती पाहून लाकूडतोड्या देवीला नम्रपणे म्हणाला, “देवी ही माझी कुऱ्हाड नाही.”

मग देवीने त्याला चांदीची कुऱ्हाड दाखवली. लाकूडतोड्या पुन्हा नम्रपणे म्हणाला, “ही कुऱ्हाड देखील माझी नाही.” नंतर देवीने त्याला लोखंडाची कुऱ्हाड दाखवली.

मोठ्या आनंदाने लाकुडतोड्या म्हणाला, “होय हीच आहे माझी कुऱ्हाड माता!” देवी खुश होऊन म्हणाली, “तुझा प्रामाणिक पणा मला फार आवडला!” या तीनही कुऱ्हाडी तुलाच ठेव. मी तुझ्या प्रामाणिकपणा मुळे तुला मोठे बक्षीस देते आहे.

तात्पर्य: **नेहमी खरे बोलावे.**

# मुंगी व कबुतर

एका मुंगीला खूप तहान लागली. म्हणून ती नदीच्या काठावर पाणी पिण्यासाठी गेली. तेंव्हा तिचा पाय घसरला व ती पाण्यात पडली. जवळच झाडावर बसलेल्या कबुतराने हे पाहिले आणि बुडणाऱ्या मुंगीची त्याला दया आली.

पटकऩ त्याने झाडाचे एक सुकलेले पान मुंगीजवळ फेकले. मुंगी पानावर चढली, आणि सुरक्षितपणे ती काठावर पोहोचली. तेवढ्यात तिथे एक फासेपारधी कबुतराला पकडण्यासाठी आला. तो कबुतरावर जाळे फेकणार, एवढ्यात मुंगी फासेपारध्यांच्या पायाला चावली.

त्यामुळे तो जोरात ओरडला. कबुतर त्यामुळे सावध झाले, व फासे पारध्याला पाहून पळून गेले. अशा प्रकारे कबुतराच्या सत्कर्माचे फळ त्याला लगेच मिळाले, व त्याचे प्राण वाचले.

तात्पर्य: **संकटकाळी मदत करणारे हेच खरे मित्र**

## ससा आणि सिंह

खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे ही. एका जंगलात एक क्रूर सिंह राहत होता. तो दररोज एका प्राण्याला ठार मारीत असे. एके दिवशी सर्व प्राणी एकत्र आले. सर्व प्राण्यांनी सिंहाला विनंती केली, “तू प्राण्यांना ठार मारू नकोस.”

“माझ्या जेवणाच्या वेळी, रोज एका प्राण्याला माझ्याकडे पाठवा. म्हणजे मी अन्य प्राण्यांना त्रास देणार नाही!” असे सिंह म्हणाला. ज्या दिवशी एकही प्राणी येणार नाही, त्या दिवशी मी तुम्हा सर्वांना ठार मारीन.” अशी धमकी त्या सिंहाने सर्व प्राण्यांना दिली. रोज ठरल्याप्रमाणे एक-एक प्राणी सिंहाकडे जाऊ लागला. एके दिवशी सशाची वेळ आली. तो सिंहाकडे जायला निघाला, तेव्हा रस्त्यात त्याला एक विहीर दिसली. विहीर दिसताच सशाला एक कल्पना सुचली. भन्नाट कल्पना सुचण्याच्या आनंदात, ससा दिवस भर जंगलात फिरत राहिला. संध्याकाळी उशिरा तो सिंहाच्या गुहेपाशी गेला. सिंहाने त्याला गुरगुरतच विचारले, “काय रे, दिवसभर तू कोठे होतास?”

ससा अत्यंत नम्रपणे म्हणाला, “मी येतच होतो, पण रस्त्यात मला दुसरा सिंह भेटला! त्याने मला अडवले.”

© BMM Marathi Shala eBook Team

सिंहाने त्याला रागावूनच विचारले, “कोठे आहे दुसरा सिंह?” ससा म्हणाला चल मी दाखवतो. सशाच्या पाठोपाठ सिंहाची स्वारी निघाली, दोघेही विहिरीपाशी आले. ससा म्हणाला, “महाराज, तो सिंह या विहिरीत लपला आहे.”

सिंहाने विहिरीत डोकावून पाहिले. स्वत:चेच प्रतिबिंब त्याने पहिले. ते प्रतिबिंब म्हणजे त्याला दुसरा सिंह वाटला. अत्यंत रागाने त्याने विहिरीत उडी मारली. अत्यंत खोल असलेल्या विहिरीत तो सिंह पडला. आणि जंगलातील प्राण्यांचे प्रश्न कायमचे सुटले. सर्व प्राण्यांना खूप आनंद झाला.

तात्पर्य: **एकीचे बळ खूप मोठे असते**

मराठी - स्वर

अ आ इ ई उ ऊ ए ऐ ओ औ अं अः

मराठी - व्यंजन

क ख ग घ ङ    च छ ज झ ञ

ट ठ ड ढ ण    त थ द ध न

प फ ब भ म    य र ल व श

ष स ह ळ क्ष ज्ञ

© BMM Marathi Shala eBook Team

आकडे मराठीत म्हणायला शिकवा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | ११ | २१ | ३१ | ४१ |
| २ | १२ | २२ | ३२ | ४२ |
| ३ | १३ | २३ | ३३ | ४३ |
| ४ | १४ | २४ | ३४ | ४४ |
| ५ | १५ | २५ | ३५ | ४५ |
| ६ | १६ | २६ | ३६ | ४६ |
| ७ | १७ | २७ | ३७ | ४७ |
| ८ | १८ | २८ | ३८ | ४८ |
| ९ | १९ | २९ | ३९ | ४९ |
| १० | २० | ३० | ४० | ५० |

© BMM Marathi Shala eBook Team

आठवड्याचे वार

रविवार

सोमवार

मंगळवार

बुधवार

गुरुवार

शुक्रवार

शनिवार

मराठी महीने म्हणा: चैत्र वैशाख ज्येष्ठ आषाढ़ श्रावण भाद्रपद आश्विन कार्तिक मार्गशीर्ष पौष माघ फाल्गुन

© BMM Marathi Shala eBook Team

प्राणी (Animals) - जंगली/ रानटी प्राणी



**वाघ**



**सिंह**




**हत्ती**



**माकड**




**चित्ता**




**हरीण**

© BMM Marathi Shala eBook Team



**अस्वल**



**कोल्हा**



**लांडगा**

© BMM Marathi Shala eBook Team

**पाळीव  प्राणी**



**कुत्रा**



**मांजर**



**गाय**



**बैल**



**बकरी**



**गाढव**

© BMM Marathi Shala eBook Team

## पक्षी  -  Birds







**कावळा**          **चिमणी**          **पोपट**









**गरूड**          **घुबड**          **मोर**


## पाण्यातील प्राणी



मासा masa



मगर magar



तारामासा Starfish




कासव kasav

© BMM Marathi Shala eBook Team 

**रंग**




**पिवळा**




**लाल**



**पांढरा**



**Brown - Tapkiri**





**Green - हिरवा**

© BMM Marathi Shala eBook Team 

**भाज्या**


**फुलकोबी** **वांगी** **टोमॅटो** **कोबी**



**दुधी भोपळा** **कांदा** **बटाटा** **लाल भोपळा**






Day- दिवस

Night - रात्र

Afternoon- दुपार

Morning - सकाळ

Today - आज

Yesterday - काल

Tomorrow - उद्या

Evening - संध्याकाळ

© BMM Marathi Shala eBook Team

**आकडे :   १, २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १०.**



© BMM Marathi Shala eBook Team 